घोषित असून १२७१ गावे अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात मोडतात. प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात येत असलेला प्रोत्साहन भत्ता या ६९७५ गावांत/क्षेत्रात प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या व तेथे मुख्यालय असलेल्या कर्मचारी आणि अधिकारी यांना अनुज्ञेय राहील.

[२] वरील क्षेत्रात देय असलेल्या प्रोत्साहन भत्त्याचे दर पुढे दिल्याप्रमाणे राहतील :-

| वेतनश्रेणी | दरमहा रुपये |
|---|---|
| मूळ वेतन रुपये ९५०/- पेक्षा कमी | १००/- |
| ९५०/- ते १४९९ | २००/- |
| १५००/- ते १९९९ | ३००/- |
| २०००/- ते २९९९ | ४००/- |
| ३०००/- ते अधिक | ५००/- |

[३] वरील दराप्रमाणे प्रोत्साहन भत्ता पुढील वर्गातील कर्मचा-यांना देय असेल :-

[अ] सर्व राज्य शासकीय कर्मचारी आणि अधिकारी.

[आ] जिल्हा परिषदांचे कर्मचारी आणि अधिकारी.

[इ] अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्थांच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील पूर्णकालिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.

[४] सदरहू प्रोत्साहन भत्ता अंशकालिक कर्मचारी व दैनंदिनीक कामगार यांना अनुज्ञेय असणार नाही.

[५] सदरहू प्रोत्साहन भत्ता दिनांक १ जानेवारी, १९९० पासून देय राहील व तो प्रारंभी आठव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंतच म्हणजे ३१ मार्च, १९९७ पर्यंत अंमलात राहील.

[६] प्रस्तावनेत क्रमांक-२ येथे उल्लेखित दिनांक २ मे, १९९२ च्या शासन निर्णयाद्वारे ज्या १५७२ अतिदुर्गम गावांत कार्यरत असलेल्या कर्मचारी आणि अधिका-यांकरिता प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्यात आला आहे, त्यापैकी जी गावे वर क्रमांक [१] येथे उल्लेखित आदिवासी उपयोजना क्षेत्रात समाविष्ट नाहीत त्या गावांतील कर्मचारी आणि अधिका-यांना वरील दरानेच प्रोत्साहन भत्ता देय राहील. त्याकरिता उप परिच्छेद [३] मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले कर्मचारी व अधिकारी पात्र राहतील.

[ ] ५. ज्या कर्मचा-यांचे / अधिका-यांचे सध्याचे वेतन व भत्ते योजनांतर्गत तरतुदीतून भागविले जातात त्यांच्या प्रोत्साहनपर भत्त्याचा खर्च योजनांतर्गत मानून तो संबंधित विभागाच्या योजनांतर्गत तरतुदीमधून भागविण्यात यावा व तो आदिवासी उपयोजनेतील खर्च म्हणून लेखण्यात यावा. मात्र ज्या कर्मचा-यांचे/अधिका-यांचे सध्याचे वेतन व भत्ते योजनेतर तरतुदीमधून भागविले जातात त्यांच्या प्रोत्साहनपर भत्त्याचा खर्च हा संबंधित विभागाच्या योजनेतर तरतुदीतून भागविण्यात यावा.

६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ [सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.५] मधील कलम, २४८ च्या परंतुका अन्वये प्रदान केलेले अधिकार व त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असा आदेश देत आहे की, जिल्हा परिषदांकडील कर्मचा-यांना / अधिका-यांना सदर आदेश योग्य त्या फेरफारासह लागू करण्यात येत आहेत.

७. वरील बाबीवरील होणारा खर्च हा संबंधित कर्मचा-यांचे / अधिका-यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्च केले जातात त्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा व त्या लेखाशीर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

...३